**Annexure - VIII**

**UNIVERSITY GRANTS COMMISSION**
**BHAHADUR SHAH ZAFAR MARG**
**NEW DELHI-110002**

**PROFORMA FOR SUBMISSION OF INFORMATION AT THE TIME OF SENDING THE FINAL REPORT OF WORK DONE ON THE PROJECT**

**1. NAME AND ADDRESS OF THE PRINCIPAL INVESTIGATOR: DR. BHARATI M. TENDULKAR**

**2. NAME AND ADDRESS OF THE INSTITUTION:**

L.J.N.J. MAHILA MAHAVIDYALAYA
PARANJAPE 'B' SCHEME,
ROAD NO. 1,
VILE PARLE (EAST),
MUMBAI 400057

**3. UGC APPROVAL NO AND DATE: F-23-1907/10(WRO) dt.6.10.2010**

**4. DATE OF IMPLEMENTATION: 30.09.2012**

**5. TENURE OF THE PROJECT: Two Years. (06.10.2010 to 06.10.2012)**

**6. TOTAL GRANT ALLOCATED: Rs. 70,000/-**

**7. TOTAL GRANT RECEIVED: Rs. 55,000/-**

**8. FINAL EXPENDITURE: RS. 56,329=50**

**9. TITLE OF THE PROJECT: "A Survey of the Syllabus at Undergraduate level of Marathi literature in various Universities of Maharashtra"**

**10. OBJECTIVES OF THE PROJECTS:**

१. भाषा विषयाचे अभ्यासक्रमातंर्गत स्वरूप, महत्व व मत-मतांतरे यांची तपासणी करणे.

२.महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमातील मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाचे स्वरूप अभ्यासणे.

३.विविध विद्यापीठांच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाचा तुलनात्मक अभ्यास करून त्यांचे विश्लेषण करणे.

**11. WHETHER OBJECTIVES WERE ACHIEVED:**

(GIVE DETAILS)

अभ्यासातून संशोधनाची उद्दिष्टे साध्य झाली आहेत. त्यांची मांडणी, प्रकल्पातील उपसंहार व निष्कर्षामध्ये केली आहे.

**12. ACHIEVEMENTS FROM THE PROJECT:**

"महाराष्ट्राच्या विविध विद्यापीठातील मराठी विषयाचा पदवीपूर्व अभ्यासक्रम : एक पाहणी" या अभ्यासतंर्गत एकूण दहा विद्यापीठांच्या मराठी विषयाचा अभ्यास केला. हा अभ्यास मराठी विषयाच्या प्राध्यापकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी महत्वाचा आहे. आज विद्यार्थ्यांना आणि समाजाला ज्या नवीन कौशल्यांची गरज आहे ती अभ्यासक्रमातून स्वीकारली गेली आहे की नाही याचे चित्र या अभ्यासातून सामोरे आले आहे. यादृष्टीने उपयुक्त अभ्यासक्रम तयार करणा-यांना या संशोधनाची मदत होऊ शकेल.

**13. SUMMARY OF THE FINDINGS:**

**(IN 500 WORDS)**

"महाराष्ट्राच्या विविध विद्यापीठांतील मराठी विषयाचा पदवीपूर्व अभ्यासक्रम : एक पाहणी " या विषयाचा अभ्यास करताना एकूण दहा विद्यापीठांच्या पदवीपूर्व मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाचा येथे विचार केला आहे ही दहा विद्यापीठे पुढीलप्रमाणे आहेत. मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, सोलापूर विद्यापीठ.

वरील विद्यापीठांच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाचे स्वरूप पाहिले तर लक्षात येते की या अभ्यासक्रमामध्ये काही पायाभूत विषयांचा आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्यांना व कलागुणांना वाव देणा-या काही विषयांचा समावेश केलेला आहे. पायाभूत अभ्यासपत्रिकांमध्ये प्रामुख्याने साहित्य आणि अनुवंशिक विषय केंद्रस्थानी दिसतात. याप्रकारच्या अभ्यासपत्रिकांतून विद्यार्थ्यांना साहित्यविषयक पूर्वसंचिताचे ज्ञान प्राप्त होते. तसेच भाषेच्या जडणघडणीचे आणि भाषा संपादनाचे कौशल्यही प्राप्त होते.

विद्यार्थ्यांच्या भाषिक व तंत्रज्ञानात्मक कौशल्यांना व कलात्मकतेला वाव देणा-या अभ्यापत्रिका उदा. व्यावहारिक व उपयोजित मराठी, संगणक, परिचय व इंटरनेट इत्यादी प्रामुख्याने सामाजिक, व्यावसायिक संदर्भ लक्षात घेऊन तयार करण्यात आल्या आहेत. म्हणजेच निव्वळ पायाभूत अभ्यासपत्रिकांचाच अंतर्भाव अभ्यासक्रमात असेल तर फक्त पदवीधरांच्या संख्येचा आकडा वाढत जाईल. पण त्याचवेळी बदललेल्या नोकरी-व्यवसायाच्या संधीचे प्रमाण कमी होत जाईल, याची जाणीव विद्यापीठांच्या मराठी अभ्यासमंडळांना आहे, हे लक्षात येते.

असे असेल तरी मराठीच्या पदवीधरांस पुरेशा नोकरीची संधी प्राप्त होताना दिसत नाही. त्यामुळे हा अभ्यासक्रम नोकरी प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये देण्यास अपुरा ठरत आहे, असेच म्हणावे लागते.

एकविसाव्या शतकात उपयुक्त आणि गुणवत्तापूर्व शिक्षण ही विकासाची गुरूकिल्ली मानली जाते.शिक्षणातून मिळणा-या ज्ञानाचा नोकरी किंवा व्यवसायासाठी उपयोग करून त्याद्वारे मिळवणे हाच बहुसंख्य तरूणांचा दृष्टिकोन दिसतो. याआधी साधारणत: मराठी साहित्य भाषेतून पदवी मिळविलेला विद्यार्थी विविध पातळयांवरील अध्यापनक्षोकडे वळत असे. साहित्यभाषेतील पदवी = अध्यापकाची नोकरी हे समीकरण गृहितच धरले जात होते, अध्यापनाबरोबरच प्रशासकीय सेवा किंवा प्रसारमाध्यमे यामध्येही भाषाविषयाच्या विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणात सेवासंधी उपलब्ध असत. त्यामुळे अध्यापकांबरोबरच प्रशासकीय सेवेतील कर्मचारी व प्रसारमाध्यमांतून भाषेचा वापर करणारे कर्मचारी निर्माण व्हावेत हेही मराठीच्या अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट होते व आहे. मात्र आज हे उद्दिष्ट पुरेशा प्रमाणात पूर्ण होण्यासाठी लागणारे सामर्थ्य अभ्यासक्रमात व अध्यापनातही राहिलेले नाही.

आजच्या मराठीच्या अभ्यासक्रमामध्ये स्पर्धापरीक्षेच्या कौशल्यास पूरक अभ्यासक्रमाची भर टाकलेली असली तरी ती पुरेशी नाही. त्यामुळे संघ व राज्य लोकसेवा आयोग स्पर्धापरीक्षेत भाषा विषयांचे विद्यार्थी पुरेशी समाधानकारक कामगिरी करू शकत नाहीत. तसेच शासकीय धोरणांमुळे साहित्य भाषापदवीधरास अध्यापनाचे क्षेत्रही उपलब्ध राहिलेले नाही. म्हणूनच पारंपरिक क्षेत्रांच्या पलीकडे जाऊन आजच्या 'जॉब मार्केट' मध्ये इतर कोणकोणत्या संधी साहित्यभाषा पदवीधरास उपलब्ध होऊ शकतात याचा विचार करून अभ्यासक्रमाची पुनर्रचना केली पाहिजे.

विद्यमान काळात 'सेवा' नोकरी-व्यवसायाच्या अधिक संधी आहेत. संगणक, सॉफ्टवेअर, हार्डवेअर, विमाक्षेत्र, पर्यटनक्षेत्र, इव्हेंन्ट मॅनेजमेंट इत्यादी क्षेत्रे विकसित होत असल्याचे त्यातील कौशल्य असणा-यांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध होत आहे. हे लक्षात घेऊन अनेक विद्यापीठांनी मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाला संगणकशास्त्राची जोडही दिलेली आहे. उदा. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठामध्ये मराठीसह संगणक अशी पदवी घेता येते तसेच अनेक महाविद्यालयांनी विद्यापीठांनी पदवीसोबत नोकरीसाठी उपयुक्त असणारे प्रमाणपत्रे, पदवीका अभ्यासक्रमही सुरू केलेले आहेत.

कोणत्याही सेवा व्यवसायात गुणात्मक दर्जापर्यंत पोहोचायचे तर त्या सेवा व्यवसायासाठी आवश्यक अशा भाषेवर प्रभुत्व असणे अत्यंत गरजेचे असते हे लक्षात घेऊनच 'व्यक्तिमत्व विकास आणि भाषा' 'भाषिक कौशल्ये' यासारख्या अभ्यासपत्रिकांचा समावेश अभ्यासक्रमात झालेला पाहावयास मिळतो. काही विद्यापीठामध्येतर उदा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये द्वितीय भाषा मराठी हा अभ्यासक्रम बी.ए., बी.कॉम, बी.एस.सी. बी.एस.डब्ल्यू. बी. एफ.ए. या सर्व ज्ञानशाखांना अभ्यासता येतो. तर 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ या विद्यापीठांच्या बी.ए. च्या तिन्ही वर्षाच्या अभ्यासक्रमामध्ये मराठी (आवश्यक) या अभ्यासपत्रिकेचा समावेश केलेला आहे. यावरून भाषा संपादनाच्या कौशल्याची निकट विद्यापीठांनी स्वीकारलेली आहे, असे म्हणतात येईल.

थोडक्यात मराठी विषयाचा (पदवीपूर्व) विद्यमान अभ्यासक्रम 'द्विस्तरीय' दिसतो. त्यामागे उदरनिर्वाहाची संधी प्राप्त करून देणे हा विचार असून तो स्वागतार्ह आहे. तरीही साहित्यभाषा विषयात पदवी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांचे 'भविष्य' फारसे उत्साहवर्धक आहे असे म्हणता येणार नाही. अर्थात याचा दोष केवळ अभ्यासक्रमांना दयायचा की बदलत्या व्यवस्थांचे भान न राखता आपल्या विद्यार्थीदशेतील 'नोटस्' वापरणा-या शिक्षकांना दयायचा की भाषेला मारक छुपे धोरण आखणा-या शासकीय यंत्रणांना द्यायचा हा प्रश्न शेष राहतोच.

**14. CONTRIBUTION TO THE SOCIETY:**

(GIVE DETAILS)

महाराष्ट्राच्या सर्व विद्यापीठांमध्ये 'मराठी' हा विषय पदवीपूर्व व पदव्युत्तर पातळीवर अभ्यासला जातो. त्यामुळे हा अभ्यास मराठी विषयाच्या प्राध्यापकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी महत्वाचा आहे.

**15. WHETHER ANY PH.D. ENROLLED/PRODUCED OUT OF THE PROJECT: No**

**16. NO. OF PUBLICATIONS OUT OF THE PROJECTS: One**
**(PLEASE ATTACH RE-PRIENT)**

**DR. BHARATI TENDULKAR**
**(PRINCIPAL INVESTIGATOR)**